तालुका बीज गुणन प्रक्षेत्र मालडोंगरी, ता.ब्रम्हपुरी,जि.चंद्रपूर येथील प्रक्षेत्रावर तालुका फळरोपवाटिका स्थापन करणेस व रू.९६.०० लाख निधीस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

शासन निर्णय क्रमांक :- फरोवा-२०१९/प्र.क्र.५०/१३-अे,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक :-१९ जून, २०१९

संदर्भ :-१) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. कृआ/फलो-२/नर्सरी/नर्सरी स्था/२०३/१८ दि.०२/०२/२०१९.

२) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.फरोवा-२०१८/४२/प्र.क्र.१३/१३-अे, दि.०२/०२/२०१८.

३) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.राकृवि०३१७/प्र.क्र.२३/राकृवियो कक्ष, दि.२३/०२/२०१८.

प्रस्तावना:-

तालुका बीज गुणन प्रक्षेत्र मालडोंगरी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर हे सन १९६१ मध्ये स्थापन झाले आहे.त्याचे प्रक्षेत्राचे एकूण क्षेत्र २०.४० हे. आहे. यापैकी गोसीखुर्द प्रकल्पाखालील क्षेत्र ४.३० हे. व बांध कामाखालील क्षेत्र ०.३० हे आहे. उर्वरित १५.८० हे क्षेत्रावर रोपवाटिका स्थापण करावयाची आहे. सदर रोपवाटिकेच्या या प्रक्षेत्रावर आंबा पिकाचे २४ मातृवृक्ष उपलब्ध असून, कागदी लिंबू, पेरू, जांभुळ, आवळा,डाळीब, इ.मातृवृक्षांची लागवड करण्यात येणार आहे.सदर प्रक्षेत्रावर बारमाही सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्याने रोपवाटिका स्थापन करण्यास वाव आहे. सदर प्रक्षेत्र हे नागभिड उपविभागात येत असून येथे आंबा कागदी लिंबू, पेरू, जांभुळ, आवळा, डाळीब, इ. प्रमुख पिकांच्या कलमा रोपांची मागणी शेतकऱ्याकडून मोठया प्रमाणात होत आहे.तसेच मग्रारोहयो, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान,भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतर्गत फळबाग लागवडी करीता कलमा रोपांची मोठया प्रमाणावर आवश्यकता आहे.

रोपवाटिका स्थापन केल्यास रोपवाटिके करिता वेगळी पदे निर्माण करावी लागणार नाही. त्याचा प्रक्षेत्रावरील कोणत्याही घटकावर परीणाम होणार नाही व वित्तीय भार पडणार नाही. या प्रक्षेत्रावर रोपवाटिका स्थापन केल्यास परीसरातील शेतकऱ्यांना कलमा रोपांची उपलब्धता होऊन फळबाग लागवड क्षेत्रात मोठया प्रमाणात वाढ होईल. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती उंचावण्यास मदत होईल. प्रक्षेत्रास कलमे रोपे विक्रिपासून आर्थिक फायदा होईल. परिणामत: मजूरांना मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल.एकूण उपलब्ध क्षेत्रापैकी १५.८० हे. क्षेत्रावर तालुका फळरोपवाटिका स्थापन करणे प्रस्तावित आहे.राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत उच्च तंत्रज्ञानावर आधारित रोपवाटिका स्थापन करणे प्रकल्पांतर्गत (सन २०१७-१८) सदरहू रोपवाटिकेस शासन रक्कम रु.९६.०० लाख मंजूर आहेत.रोपवाटिकेची निकड विचारात घेता पीक पध्दतीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी फलोत्पादन

क्षेत्रात वाढ करणे आवश्यक आहे. करीता तालुका बीज गुणन प्रक्षेत्रावरील संपुर्ण क्षेत्रावर तालुका फळरोपवाटिका स्थापन करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत उच्च तंत्रज्ञानावर आधारीत फळरोपवाटिका स्थापन करणे प्रकल्पांतर्ग रु. १९.९६५ कोटी रकमेचा प्रकल्पास मंजूरी देण्यात आली आहे. तालुका बीज गुणन प्रक्षेत्र मालडोंगरी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर या प्रक्षेत्राचे १५.८० हे क्षेत्रावर रोपवाटिका स्थापण करण्यास कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.२०१८/४२/प्र.क्र.१३/१३-अे, दि.२/२/२०१८. मध्ये दिलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून आणि कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. राकृवि-०३१७/ प्र.क्र.२३/ राकृवियो,दि.२३/२/२०१८ मध्ये दिलेल्या लेखाशिर्षातंर्गत, सदरहू रोपवाटिकेस रु.९६.०० लाख, **प्रपत्र -अ प्रमाणे** प्रस्तावित कामांसाठी वित्तीय नियम पुस्तिका१९७८ भाग-पहिला, उपविभाग १ ते ५ पुस्तिकेतील परिच्छेद क्र. १३४ (३)अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१९१७०६०९०१०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Ashok Maroti Atram
Date: 2019.06.19 17:05:37 +05'30'

(अशोक आत्राम)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त कृषी, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. संचालक फलोत्पादन, कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे,
३. विभागीय कृषी सहसंचालक,नागपूर विभाग,नागपूर.
४. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, चंद्रपूर
५. महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर,
६. महालेखापाल-१/२ , (लेखा परीक्षा) मुंबई /नागपूर,
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
८. सहसंचालक लेखा व कोषागारे,संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन,५ वा मजला,मुंबई -३२,
९. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), कृषि व पदुम (कृषि व फलोत्पादन) विभाग, मंत्रालय,मुंबई.
१०.निवड नस्ती १३-अे.

("प्रपत्र-अ" शासन निर्णय क्रमांक :- फरोवा-२०१९/प्र.क्र.५०/१३-अे,)

फळरोप वाटीकेसाठी घटकनिहाय प्रस्तावित खर्च:-

आदर्श रोपवाटिका स्थापन करणे अंतर्गत आराखडयातील विकास कामांचा सुधारित तपशील

अ.क्र.	विकास कामे	क्षेत्र क्षमता	संख्या	संभाव्य खर्च (रु.लाखात)
१	जमीन विकसन व साफसफाई	४.०० हे.	---	३.५०
२	चेक लिंक कुंपण	४.०० हे.	-------	१४.५०
३	लोखंडी शेड हाऊस दुरूस्ती व नवीन	५००० चौ.फुट	२	७.००
४	भांडारगृह दुरूस्त करणे	७९२ चौ.फुट	१	४.००
५	औजारगृह व कार्यालय दुरूस्ती	७९२ चौ.फुट	१	४.००
६	पॉटींग हाऊस नवीन	७९२ चौ.फुट	१	४.००
७	माती निर्जतीकरण ओटा	१४०० चौ.फुट	१	४.००
८	नवीन मातृवृक्ष लागवड	आंबा-२००	२.००	०.८०
		आवळा-६०	०.२०	०.२०
		चिकू-५०	०.५०	०.५०
		औषधी वनस्पती	०.१०	०.८०
९	हरतिगृह (२००० चो.मी.)	२०००चौ.मी.	१	५.००
१०	सौर ऊर्जा पंप	७.५०एच.पी	१	७.५०
११	विद्युत पंप साहित्यासह	५ एच.पी.	२	१.२०
१२	लोखंडी शेड मधील सिमेंट बेड	------	-	११.००
१३	गांडूळ खत युनिट उभारणी शेडसह	३०X२० फुट	१	५.००
१४	यांत्रिक सुविधा (यंत्र सामुग्री)	------	-	५.००
१५	सिमेंट रस्ता	२००मी	-	८.००
१६	इतर संकिर्ण	------	-	१०.००
एकूण			-	**९६.००**